**पोलीस उप-आयुक्त,गुन्हे पिंपरी चिंचवड**
पोलीस आयुक्त कार्यालय,पिंपरी चिंचवड,
प्रेमलोक पार्क,चिंचवड,पुणे-३३ दुरध्वनी क्र. ०२०-२७३५०१२०
ई मेल आयडी – dcphq.pcpc-mh@gov.in

# प्रेसनोट

## रुपीनगर,चिखली येथे झालेल्या महिलेच्या निघृण खुनाचा गुन्हे शाखेकडुन उलगडा

## पिंपरी चिंचवड,गुन्हे शाखा, युनिट १ ची उल्लेखनिय कामगिरी

दि.०६/०७/२०२३ रोजी रुपीनगर चिखली येथील राजमाता जिजाऊ हौ.सोसा.येथे दुपारच्या सत्रात घरी कोणीही नसताना अज्ञात इसमाने एका महिलेचा डोक्यात जड वस्तुच्या सहाय्याने मारहान करुन खुन केला होता.सदर खुनाबाबत चिखली पोलीस ठाणे येथे गु.रजि.नं.४२१/२०२३ भादंवि कलम ३०२,४५५ अन्वये गुन्हा दाखल होता. सदर गुन्हयाचा समांतर तपास गुन्हे शाखा, युनिट १ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट १ च्या दोन वेगवेगळया टिम तयार करुन तांत्रिक तपास,सीसीटीव्ही फुटेजेस,स्थानिक तपास,गोपनीय माहिती या सर्व तपासाच्या माहितीचे विश्लेषण करुन मयत महिला हिचा खुन हा तिचे शेजारी राहणारा मुलगा याने केल्याची प्राथमिक खात्री झाल्याने लागलीच पोलीस निरीक्षक संतोष पाटील व स्टाफ असे राजमाता जिजाऊ हौसिंग सोसायटी, रुपीनगर,पुणे येथे जावुन मुलास त्याचे वडीलांसमक्ष विश्वासात घेवुन मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने त्याचेकडे तपास करता त्याने माहिती दिली की, काही दिवसांपुर्वी मयत आजीचा मुलगा हे त्याचे वडीलांचे मित्र असल्याने तो त्याच्या घरात गेला असता त्याला मयत आजीने धक्काबुक्की व अपमान करुन घराबाहेर काढले होते. त्यामुळे तेथे राहणा-या लोकांसमोर व महिलांसमोर त्याचा अपमान झाल्याने त्याचा राग मनात होता. त्यानुसार घरी कोणी नसताना त्याने महिला नामे शोभा आमटे (मयत) हिचे डोक्यात लोखंडी बत्त्याने मारुन खुन केला आहे वगैरे व इतर हकीगत सांगुन गुन्हयाची कबुली दिली आहे. आरोपी मुलगा हा चौकशी व मिळालेल्या माहितीवरुन विधीसंघर्षित बालक असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदरची कारवाई पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, सह पोलीस आयुक्त संजय शिंदे, अप्पर पोलीस आयुक्त वसंत परदेशी, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) स्वप्ना गोरे,सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) सतिश माने, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष पाटील,पोलीस अमंलदार शिवाजी कानडे,बाळासाहेब कोकाटे,महादेव जावळे,सोमनाथ बोऱ्हाडे,मनोजकुमार कमले,फारुक मुल्ला,अमित खानविलकर,गणेश महाडिक, सचिन मोरे,प्रमोद हिरळकर,उमाकांत सरवदे, अजित रूपनवर, प्रमोद गर्जे, मारोती जायभाये, स्वप्नील महाले, तानाजी पानसरे यांनी केली आहे.

(स्वप्ना गोरे)
पोलीस उप आयुक्त (गुन्हे शाखा)
पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय,पुणे